# वन विभाग

## १. सीआर/०३/औरंगाबाद/१४

फिर्यादी यांचे भारत सॉ मिल नावाने लिंबे जळगाव, जिल्हा बीड येथे  ाासनमान्य लाकूड कापण्याचा व्यवसाय आहे. सदर सॉ मिलचे लायसन्स नूतनीकरण करण्यासाठी उप वनरक्षक कार्यालय, औरंगाबाद येथे रु.१००/—च्या बंधपत्रावर अर्ज केला होता. सदर बंधपत्रावर वन क्षेत्रपाल यांच्या सहीची आवश्यकता होती. त्याकरीता वन विभाग कार्यालय, खुलताबाद जिल्हा औरंगाबाद येथील आलोसे पांडुरंग फुले, वन क्षेत्रपाल, औरंगाबाद यांच्या कार्यालयात फिर्यादी स्वाक्षरी घेण्यासाठी गेले असता आलोसे पाडूरंग फुले  यांनी बंधपत्रावर सही करण्यासाठी रु. ६०,०००/— लाचेची मागणी केली. त्यापैकी रु. २०,०००/— दिनांक १६/१२/२०१३ रोजी आलोसे यांना दिले. तसेच रु. २५,०००/—आलोसे यांच्या घरी दिले.

दिनांक १/१/२०१४ रोजी फिर्यादीकडून उर्वरीत रु.१५०००/— लाचेची रक्कम स्वीकारताना आलोसे पांडुरंग फुले, वन क्षेत्रपाल यांना रंगेहाथ पकडण्यात आले.

सदरबाबत वाळूंज पोलीस ठाणे, गु.र.क्र.३००२/२०१४ लाप्रका कायदा कलम ७,१३(१) (ड) सह १३(२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आली आहे.

## २. सिआर/७३/भंडारा/१५

फिर्यादी यांचा लाकुड खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. फिर्यादी यांनी वनपरिक्षेत्र लाखनी विभागाअंतर्गत सागवनाची झाडे खरेदी केली होती. सदर झाडांची कटाई करण्याबाबतचा जाहीरनामा काढुन झाडांची कटाई करण्याची परवानगी मिळणेकरिता कार्यालय वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र लाखनी जि. भंडारा येथिल कार्यालयात रितसर अर्ज सादर केला होता.

सदरची अर्जाच्या संबंधाने फिर्यादी हा आरोपी लोकसेवक प्रदीप पुडलिकराव ढोले, वय ५२ वर्षे, वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र कार्यालय लाखनी जि. भंडारा यांना भेटला असता त्यांनी परवानगी देण्याकरिता फिर्यादीस रु.३,०००/— लाच रक्कमेची मागणी केली.

दि. २२/०१/२०१५ रोजी आरोपी लोकसेवक प्रदीप पुडलिकराव ढोले यांनी तक्रारीकडुन रु.३,०००/— लाच रक्कम स्विकारल्यावरून रंगेहाथ पकडण्यात आले.

सदरबाबत पो. पो.स्टे. लाखनी, जि. भंडारा येथे अप.क्र. ३००३/१५ कलम ७, १३(१)(ड), १३(२) ला.प्र.का. १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येवून आरोपी यांना अटक करण्यात आली आहे.

## ३. सिआर/१०७/गोंदिया/१५

फिर्यादी यांचा लाकडाचा व्यावसाय आहे. तक्रारदार यांनी शेतकऱ्यांचे शेतीतील खरेदी केलेल्या झाडाची कापणी केल्यानंतर त्याची पाहणी करून हॅमरची निशाणी व पासिंग आर्डर तयार करून दिले सदर केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन आरोपी लोकसेवक दिलीप श्यामराव टेकाडे वय ५० वर्ष सहाय्यक वनसंरक्षक गोंदीया वन विभाग जि गोंदीया यांनी रु.१०,०००/— लाच रक्कमेची मागणी केली.

दि. ०२/०२/२०१५ रोजी आरोपी लोकसेवक दिलीप श्यामराव टेकाडे सहाय्यक वनसंरक्षक यांना तक्रारीकडुन रु.१०,०००/— लाच रक्कम स्विकारल्यावरून रंगेहाथ पकडण्यात आले.

सदरबाबत पो.स्टे. गोंदीया शहर, अप. क्र. ३०२४/१५ कलम ७,१३(१)(ड) सह कलम १३(२) ला.प्र.का. सन १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येवून आरोपी यांना अटक करण्यात आली आहे.